जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 AUG 2025
पुढारी

# विद्यापीठात स्वातंत्र्यसैनिकांच्या दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन सुरू

## ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त उपक्रम; सुमारे २ हजार दुर्मीळ छायाचित्रांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांच्या कार्याची माहिती असणाऱ्या सुमारे २ हजार दुर्मीळ छायाचित्रांच्या प्रदर्शनास शुक्रवारी प्रारंभ झाला. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात शनिवारपर्यंत प्रदर्शन सुरू राहणार आहे.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. पुणे येथील जयहिंद फाऊंडेशन आणि कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रदर्शनाचे संकल्पक चंद्रकांत शहासने यांनी अथक परिश्रमातून संकलित व संग्रहित केलेल्या माहितीमधून भारतातील क्रांतिकारकांची शौर्यगाथा या प्रदर्शनाद्वारे उलगडणार आहे.

विशेषतः महाराष्ट्रातील आदिवासी क्रांतिकारकांसह पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा व विदर्भातील स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याचा आढावा यात घेण्यात आला आहे.



कोल्हापूर : विद्यापीठात स्वातंत्र्यसैनिकांच्या माहिती प्रदर्शनाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. समवेत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. केशव राजपुरे, चंद्रकांत शहासने, डॉ. दत्ता मचाले, उमाकांत हत्तीकट. (छाया : नाज ट्रेनर)



क्रांतिकारकांनी केलेला त्याग, दिलेले बलिदान, दाखवलेले धैर्य व चिकाटी याचे एक प्रेरक चित्र या प्रदर्शनात मांडलेल्या माहितीफलकांमधून सामोरे येते. प्रदर्शनास भेट देऊन त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 AUG 2025
लोकमत

# स्वातंत्र्यसैनिकांच्या दुर्मीळ छायाचित्रांचे विद्यापीठात प्रदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत ऑगस्ट क्रांतिदिनाच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांच्या कार्याची माहिती असणाऱ्या सुमारे २००० दुर्मीळ छायाचित्रांच्या प्रदर्शनास शुक्रवारी सकाळी प्रारंभ झाला. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात आज शनिवारपर्यंत हे प्रदर्शन सुरू राहील.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

पुणे येथील जयहिंद फाउंडेशन आणि कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनाचे संकल्पक चंद्रकांत शहासने यांनी संकलित व संग्रहित केलेल्या माहितीमधून संपूर्ण भारतातील क्रांतिकारकांची शौर्यगाथा या प्रदर्शनाद्वारे उलगडणार आहे.

कोल्हापूर शहर व परिसरातील शिक्षक, विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांनीही या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट देऊन त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन शहासने आणि इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 AUG 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठात दुर्मीळ छायाचित्र प्रदर्शनास प्रारंभ

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत ऑगस्ट क्रांतिदिनाच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांच्या कार्याची माहिती असणाऱ्या सुमारे २००० दुर्मीळ छायाचित्रांच्या प्रदर्शनास शुक्रवारी (दि. ८) सकाळी प्रारंभ करण्यात आला.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात दि. ९ पर्यंत हे प्रदर्शन सुरू राहील. सकाळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. पुणे येथील जय हिंद फाऊंडेशन आणि कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रदर्शनाचे संकल्पक चंद्रकांत शहासने यांनी अथक परिश्रमातून संकलित व संग्रहित केलेल्या क्रांतिकारकांची शौर्यगाथा या प्रदर्शनाद्वारे उलगडणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 AUG 2025
तरुण भारत

# 'विद्यापीठातील स्वयंअध्ययन साहित्य लेखन परंपरा सर्वोत्तम'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांना सुविधा दिल्या जातात. सुविधांमधील स्वयं अध्ययन साहित्य लेखनाची परंपरा सर्वोत्तम आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुधारित अभ्यासक्रमांप्रमाणे बी.ए.-भाग २ राज्यशास्त्र स्वयं अध्ययन साहित्य प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. हा कार्यक्रम व्यवस्थापन परिषद सभागृहात झाला. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांना वेळेत स्वयंअध्ययन साहित्य देण्याने दूरशिक्षण हे नजीकचे शिक्षण होत आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने तयार करण्यात आलेले स्वयंअध्ययन साहित्य सर्वच विद्यार्थ्यांना उपयोगी ठरणारे आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. शार्दुल सेलुकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. ज्योती जाधव, राज्यशास्त्र विषयाचे घटक लेखक. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सचिन भोसले, डॉ.देठे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 AUG 2025
सकाळ

# विद्यापीठातील सुरक्षा रक्षकांचे आंदोलन मागे

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठात काही दिवसांपासून थकीत बिलापोटी सुरू झालेल्या माजी सैनिक सुरक्षा रक्षकांच्या आंदोलनाची दखल घेत राज्य शासनाने २७ लाख ९८ हजार रुपये मंजूर केले. विद्यापीठ प्रशासनाने त्याबाबतचे लेखी पत्र दिल्यानंतर माजी सैनिकांनी आंदोलन मागे घेतले.

सैन्यात निवृत्त झाल्यानंतर माजी सैनिक विद्यापीठात सुरक्षा रक्षक म्हणून काम करत होते. या कामातून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना निवृत्ती वेतनातील फरक, रजा रोखीकरण देण्यात आले नाही. तसेच सातवा वेतन आयोगानुसार वेतन मिळावे, या मागणीकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे थकीत वेतनासाठी त्यांनी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलनास सुरुवात केली. विद्यापीठ फंडातून रक्कम द्या, अशी त्यांनी मागणी केली.

अखेर विद्यापीठ प्रशासनाने उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाकडे त्याबाबतची कागदपत्रे पाठवून पाठपुरावा सुरू केला. शासनाने माजी सैनिकांच्या आंदोलनाची दखल घेत २७ लाख ९८ हजार रुपये मंजूर केले.